# 'बुद्धिप्रामाण्यवादी' सुधारकाचार्य आगरकर

डॉ. अजय कुळकर्णी

प्रा. प्रियंका आकाश राऊत

प्रस्तावना

सुधारकाचार्य गोपाळ गणेश आगरकर म्हणजे विवेकवादी, तर्कशुध्द समाजसुधारक. बुध्दिवादाची कमाल मर्यादा म्हणूण अनेक विभूतींनी ज्या थोर समाजसुधारकाचा यथार्थ गौरव केला ते गोपाळ गणेश आगरकर होत. आगरकरांचे संपूर्ण जीवन खर्या अर्थाने एका क्रांतिकारकाचे होते. त्यांनी आपल्या प्रभावी विचारातून अवघ्या महाराष्ट्राला वळण लावण्याचा प्रयत्न केला. लोकशिक्षण व लोकजागृतीचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी बुध्दिप्रामाण्यवाद आणि व्यक्तिस्वातंर्त्य या दोन गोष्टींना प्राधान्य दिले. बदलत्या परिस्थितीनुसार समाजपरिवर्तनही झाले पाहिजे असे ते नेहमी म्हणत. प्रथम समाजजागृती, लोकशिक्षण झाल्याशिवाय राजकीय सुधारणा उपयुक्त ठरणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. स्त्रीमुक्ती हाही त्यांच्या ध्यासाचा विषय. सर्व मुलांमुलींसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे आणि शिक्षण घेण्याच्या समान संधी स्त्री—पुरूषांना कुठलाही भेदभाव न करता देण्यात याव्या असा त्यांनी आग्रह धरला. त्याचप्रमाणे एकत्र कुटुंबातील स्त्रियांना भोगाव्या लागणार्या यातनांबद्दल त्यांनी परखड मत मांडले आहे. स्त्रियांच्या हक्कांबाबत जॉन स्टुअर्ट मिलने जे विचार मांडले ते आगरकरांना मान्य होते आणि त्या विचारांची भारतीय संदर्भात त्यांनी चर्चा केली. जुनी कुटुंबरचना बदलून स्त्रियांना समान हक्क् देण्यावर त्यांनी भर दिला. पाश्च्यात्य शिक्षणामूळे त्यांच्या चांगल्या गोष्टी तेवढया स्वीकाराव्यात मात्र त्यांचे अंधानुकरण करू नये, आपल्या धर्मातील दोषस्थळे शोधून ती काढून टाकावीत व हे सर्व तर्क, बुद्धी व ज्ञानाच्या बळावर सद्यस्थितीचे भान राखून करावे. (१) असे त्यांचे मत होते. जातीभेद, वर्णभेद व स्त्रियांना दिली जाणारी वागणूक यावर त्यांनी कठोर टीका केली.

बुध्दिप्रामाण्यवादी सुधारकाची जडणघडण रू

आगरकरांच्या जडणघडणीत त्यांच्या शालेय व महाविद्यालयीन गुरूजन व काही अंशी स्वानुभवावरून व मोठया प्रमाणात पाश्चिमात्य विचारवंतांच्या अभ्यासाचा प्रभाव होता. आगरकरांवर सुरूवातीच्या काळात विष्णू मोरेश्वर महाजनी (जे अकोल्यातील सरकारी शाळेत शिक्षक होते) यांचा प्रभाव होता. महाजनींनी आगरकरांकडे कौतुकाने खूप लक्ष दिल्याने त्यांच्यावर शालेय जीवनात प्रभाव पडला. त्यांनी आगरकारांची शाळेतील व शाळेबाहेरील बौध्दिक भूक तर भागविलीच परंतु त्यांचे मामा व पालक रामभाऊ भागवत यांना आगरकरांच्या पुढील शैक्षणिक जीवनाबद्दल सल्लाही दिला, त्यांना पुढील शिक्षण पुण्यात घेता यावे म्हणूण महाजनींनी व इतर शिक्षकांनी आर्थिक तरतुद केली. 'महाजनींनी आगरकरांची वैचारिक बैठक घडविली नसेल, तरीही त्यांनी आगरकरांच्या मनाची क्षितिजे खूप मोठी केली. पाश्चात्य उदारमतवादी विचारसरणीची त्यांना ओळख करून दिली. त्यांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन दिले आणि खर्या अर्थाने ते मित्र, तत्वज्ञानी व मार्गदर्शक झाले. या शिक्षक विद्यार्थ्यातील वात्सल्याचे बंध अखेरपर्यंत तसेच राहीले. नंतरच्या दिवसांत आगरकरांच्या वर्तमानपत्रातील लिखानातील त्रुटी दाखवून देण्यास महाजनींनी कमी केले नाही.(२)

नंतरच्या काळात आगरकरांवर सर्वात अधिक प्रभाव पडला तो प्राध्यापक फ्रान्सिस गाय सेल्बी यांचा. त्यांच्याच सहवासामध्ये आगरकरांच्या बुध्दीला खर्या

सहयोगी प्राध्यापक / मार्गदर्शक
सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, नागपूर भ्रमणध्वनी — ९४२३४०३६५९
सहायक प्राध्यापक
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा जि. नागपूर भ्रमणध्वनी — ९३७१६ ७०८८३

अर्थाने बहर आला. सेल्बी हे अज्ञेयवादी होते आणि लंडन विद्यापीठाच्या धर्मनिरपेक्ष वातावरणात वाढलेले होते. पदव्युत्तर शिक्षणाची दोन वर्षे आगरकरांना बौध्दीकदृष्टया फार फलप्रद ठरली त्यामुळे त्यांना विद्यापीठाच्या क्रमिक पुस्तकाबाहेर कितीतरी अवांतर वाचन करण्यास सवड मिळाली. यामुळे त्यांचे वैचारिक क्षितीज खूप विस्तारले आणि ते पाश्चात्य विचारांचे गाढे अभ्यासक झाले. ज्या पाश्चात्य विचारवंतांचा आगरकरांवर बराच प्रभाव पडला. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांची बुध्दिमत्ता व चारित्र्य घडविण्यात जॉन स्टुअर्ट मिलचा प्रभाव सर्वाधिक होता. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने आगरकरांची मिलच्या लिखाणाशी प्रथम ओळख झाली. 'डोगरीच्या तुरूंगातील आमचे १०१ दिवस' या पुस्तकात आगरकरांनी 'सत्यमेव जयते' या प्राचीन वचनातील जो चुकीचा युक्तिवाद दाखवून दिला, तो मिलकडून घेतलेला आहे. "आगरकरांच्या लिखाणाची व त्यांनी चर्चिलेल्या सामाजिक प्रश्नाची काळजीपूर्वक तपासणी केल्यास मिलच्या 'सब्जेक्षन ऑफ विमेन' (स्त्रियांची परवशता) या त्यांच्या पुस्तकाचा प्रभाव लक्षात येतो. पुरूष वर्गाप्रती असलेली स्त्रियांची मानसिक अधिनता आणि त्यातून उद्‌भवणारी सामाजिक दुर्बलता दाखविणे आणि स्त्री–पुरूषात समतेच्या तत्वाचा पुरस्कार करणे हा या पुस्ताकाचा विशेष हेतू होता."(३) धर्म या विषयावर मिलने 'द नेचर', 'द युटीलीटी ऑफ रिलिजन' हे दोन्ही लेख १८५०–५८ या काळात लिहिले होते आणि 'थिईझम १८६८–७० हे तिन्ही लेख त्याच्या मृत्यूनंतर छापले गेले. हे लेख स्पेन्सरच्या या लिखाणाबरोबर वाचले तर आगरकरांच्या धर्मकल्पनांची घडण होण्यात त्यांचा किती मोठा वाटा होता हे कळून येते. मिलसारखेच आगरकरसुध्दा अज्ञेयवादीपेक्षा साशंकवादी होते. आगरकरांना मिलच्या प्रती असलेले बौध्दिक ऋण विष्णू मोरेश्वर महाजनींनी आपल्या आठवणीत मान्य केले आहे.

आगरकरांच्या विचारप्रक्रियेत हर्बर्ट स्पेन्सरचाही प्रभाव अतिशय चिरकाल आहे. स्पेन्सरला "उत्क्रांतीचा प्रेषित" म्हणत. उत्क्रांती सिध्दांताचे तात्विक परिणाम मांडले ते स्पेन्सरने आणि त्याला वैज्ञानिक पाया दिला तो डार्विनने. त्याच्या राजकीय व सामाजिक भाकितांच्या संदर्भात त्याने उत्क्रांतीचा सिध्दांत मांडला तोच उत्क्रांती आणि विकासाचा मूळ सिध्दांत राजकीय पशू व मानवी जगासही लागतो, असे त्यांनी मत मांडले. आगरकरांच्या 'आमचे काय होणार?' आणि 'राजकीय संविधानाचे अपायकारकत्व' या लेखात 'प्रिन्सिपल ऑफ सोशलॉजी' मध्ये चर्चिलेल्या 'संरचना व क्रियाविषयकवाद या स्पेन्सरच्या सिध्दांताची सरळ आणि सुबोध मांडणी दिसून येते. त्याचप्रमाणे प्रत्यक्षार्थवादाचा जनक म्हणूण ओळखल्या जाणार्या ऑगस्तकॉम्त यांचा आगरकरांच्या विचारांवर खोलवर प्रभाव पडला होता. हा प्रभाव मिलने लिहिलेल्या 'ऑगस्तकॉम्त अॅण्ड पॉझिटिव्हीझम' या लेखाद्वारे झाला होता. आगरकरांच्या वैचारिक घडणीत एडवर्ड गिब्बन या इंग्लिश इतिहासकाराचा विशेष वाटा आहे. गिब्बन लिखित 'डिक्लाइन अॅण्ड फॉल ऑफ रोमन एम्पायर' आगरकरांना किती आवडत असे, हे वि. मो. महाजनींनी १९१६ मध्ये लिहिलेल्या आठवणीवरून लक्षात येते. एका मित्राने आपण भगवाद्‌गीतेचे पारायण करतो असे सांगितल्यावर त्याला आगरकरांनी त्याऐवजी गिब्बनचे पारायण करण्यास सांगितले. गिब्बनच्या साहित्यिक शैलीचाही बराच प्रभाव आगरकरांच्या लेखन शैलीवर पडला. थॉमस हेन्री हक्सले यांनी लिहिलेल्या 'इमॅन्सिपेनरू ब्लॅक अॅण्ड व्हाइट' या लेखाचा 'स्त्रीदास्यविमोचन' नावाने १८८२ मध्ये आगरकरांनी केलेला मराठी अनुवाद यावरून हक्सलेचे त्यांच्यावरील असलेले वैचारिक ऋण आपल्या ध्यानात येते.

जॉन स्टुअर्ट मिलबद्दल जॉन मोर्ले याला जितके कौतुक होते. तितकेच आगरकरांनाही होते. तसेच मोर्लेच्या लिखाणानेही ते प्रभावित झाले होते. मोर्लेच्या सर्व पुस्तकांपैकी ज्यांचा प्रभाव आगरकरांवर निरंतर राहिला ते म्हणजे 'ऑन कॉम्प्रमाईज' हे पुस्तक होय. यातील विचार सुधारकातील 'गुलामाचे राष्ट्र' या लेखात स्पष्ट दिसतात. आगरकरांना ब्रॅडलॉबद्दलही खूप आदर होता. तो फक्त भारताच्या स्वातंर्त्याचा कैवारी होता म्हणूणच नव्हे तर

"त्याच्या हृदयाच्या उच्चतेमुळे व थोरवीमुळे, त्याच्या स्वभावाच्या पवित्रतेमुळे आणि विसंगती म्हणजे आयुष्यातील मोठया काळात त्याला सामोरे जावे लागलेल्या छळामुळे होय." (४) आगरकरांनी विद्यार्थीदशेत असतानाच ब्रॅडलॉचे नास्तिक विचार वाचले होते आणि त्यांच्या धर्मनिरपेक्ष भूमिकेस त्याला पाठिंबाही दिला होता. ब्रॅडलॉ आणि आगरकर या दोघांचाही राजकीय व सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन धर्मनिरपेक्ष होता. ब्रॅडलॉ भारताचा सच्चा मित्र होता, ब्रॅडलॉच्या माल्थसवाद आणि 'पुअर लॉज' बाबतच्या विचारांनी आगरकर प्रभावित झाले होते.

वरील सर्व प्रभावांचा संकलित परिणाम आगरकरांच्या बौध्दिक विकासात झाला. तथापि, ते प्राचीन भारतीय विचारवंतांबद्दल अनभिज्ञ नव्हते हेही ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. अधूनमधून आढळणार्या अनेक उल्लेखांवरून गौतम बुध्दाबद्दल आगरकरांना विशेष आदर होता हे लक्षात येते. किंबहुना बुध्दाचा अज्ञेयवाद, करूणा आणि समता या तत्वांवर त्याने दिलेला भर, तसेच धर्मनिरपेक्ष नीतिशास्त्र या सर्व गोष्टींचे आगरकरांना आकर्षण होते. सॉक्रेटिस, येशू ख्रिस्त आणि महंमद पैगंबर यांसारख्या मोठया नैतिक विचारवंतांची बरोबरी त्यांनी गौतम बुध्दांशी केली ज्यांच्या लेखनात धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन आहे, अषा कालिदास, भवभूतीसारख्या प्राचीन भारतीय लेखकांबद्दलचे अनेक उल्लेख आगरकरांच्या लेखनात सापडतात. भारतीय विचारवंतांपेक्षा प्रबोधनकाळातील पाश्चात्य विचारवंतांची त्यांच्यावर सर्वात अधिक छाप होती, याचे कारण युरोपातील ऐतिहासिक घटनांमुळे त्यांच्या विचारांची वाढ कळसास पोहचली होती अशी त्यांची धारणा होती. त्यामुळेच त्या काळाचे वैशिष्ट्य असलेली धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी आणि वैज्ञानिक—वैश्विक दृष्टी वृध्दिंगत झाली होती.

निष्कर्ष :

१. आगरकरांमध्ये वैचारिक सुस्पष्टता, धारिष्ट्य आणि वाणीकृतीतील एकवाक्यता होती.
२. आगरकरांच्या विचारांचे त्यांच्या समकालीनांनी फारसे चीज केले नाही. स्वातंर्त्योत्तर काळातही पारतंर्त्य संपल्याच्या जल्लोषात आगरकरांच्या सुधारणाविचारांना अज्ञातवास घडला.
३. महाराष्ट्र जीवनाच्या सर्व अंगावर साचलेली रूढीची अंधश्रध्देची, दुराग्रहाची व अज्ञानाची जळमटे शोधून ती दूर करण्याचे आवाहन समाजाला करणे आणि समाजाच्या सर्वांगीन उन्नतीस आवश्यक असे विवेकवादाचे तत्वज्ञान समाजाच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करणे.
४. आगरकरांनी आपल्या निष्कलंक, नि:स्वार्थ व कृतिशिल चारित्र्याची जोड देऊन विवेकी जीवनाचा आदर्श समाजापुढे ठेवला.
५. आगरकरांनी समाजसुधारणेचा पुरस्कार करण्यापूर्वी समाज जीवनाच्या मूलतत्वांचा सूक्ष्म अभ्यास केला होता, सामाजिक घडामोडीची सुस्पष्ट कल्पना आल्यावरच लोक सुधारणेस अनुकूल होतील असा त्यांचा विश्वास होता.

संदर्भ सूची

१. गर्गे स. मा. 'समाजसुधारक गो.ग. आगरकर', नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली पाचवी आवृत्ती २००९ पृ. ३१
२. गणाचारी अरविंद 'गो.ग. आगरकर बुध्दिप्रामाण्यवादी विचारवंत आणि थोर समाजसुधारक', हर्ष भटकळ पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. ३०१ महालक्ष्मी चेंबर्स २२ पहिली आवृत्ती २०१६ पृ. ९१
३. प्रधान ग.प्र. 'आगरकर लेख संग्रह', साहित्य अकादमी रविंद्र भवन नवी दिल्ली पृ. ९
४. खांडेकर वि.स.,'गोपाळ गणेश आगरकर' व्यक्ती आणि विचार' मेहता पब्लिशिंग हाऊस १९४१ पृ. ११